International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)

E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप

**डॉ.विजया पांडुरंग पाटील**

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,उंब्रज

**सारांश**

भारतीय संस्कृती प्राचीन व प्रगल्भ आहे. वेगवेगळ्या प्रांतात लोकप्रथा आणि वैदिक संस्कृती याच्यातील बदल, मानव आणि सभोवताल यांचे दर्शन लोकसाहित्यातून घडते. लोकसाहित्याचा अभ्यास करताना लोकसाहित्य मानवी मन, समाज व्यवहार, सांस्कृतिक परंपराचे जतन करते. यामुळे लोकसाहित्याला साहित्यिक गुणविशेषता लाभलेली दिसते. लोकसाहित्यातील मौखिक साहित्य यामध्ये समूहाच्या भावनांचे, अनुभवाचे, ज्ञानाचे प्रकटीकरण झालेले दिसते. साहित्याचा सामाजिक, सांस्कृतिक बाजूने अभ्यास करताना मौखिक साहित्याचा उपयोग होतो.लोकसाहित्य हे शाब्द व शाब्देतर सामग्री अशा स्वरुपात दिसून येते.लोकसाहित्याचा अविष्कार गतिमान असून ते जुने ही नाही आणि नवे ही नाही ते अखंड प्रवाही असल्याचे दिसते. जीवन संदर्भ व परिसर संदर्भ नुसार बदलत राहतात. याचा करविता अनामिक असल्याने समुहमनाचा अविष्कार होतो. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तर्धात मराठी लोकसाहित्याचे संकलनास काशिनाथ छत्रे,विष्णुशास्त्री चिपळूणकर, म.मो.कुंटे यांनी सुरुवात केली. परंतु विसाव्या शतकात अभ्यासाबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले. यामध्ये वि. का. राजवाडे, सानेगुरुजी, काका कालेलकर, दुर्गा भागवत, तारा भवाळकर रा.चि. ढेरे, प्रभाकर मांडे, मधुकर वाकोडे यांनी लोकसाहित्याचा अभ्यासास वातावरण अनुकुअल बनवले. जागतिक लोकसाहित्य, भारतीय लोकसाहित्य व वाड्मयीन लोकसाहित्य असा अभ्यासास प्रारंभ झालेला दिसतो.

**बीजशब्द:** मौखिक, अनामिक, लोकानुभव, समूहमन, परंपरागतता, आदिम समूह.

**शोधपद्धती:**

लोकसाहित्य हे प्रवाही व जिवंत असल्याने कर्त्याचा अभाव, मौखिकता, पारंपारिकता, परिवर्तनशीलता सामुहिक अविष्कार, विधीशी नाते यांच्याशी ती जोडलेली असते. लोकसाहित्याचा अभ्यास करताना ऐतिहासिक पद्धती, समाजशास्त्रीय पद्धती, कार्यात्मक पद्धती याद्वारे करण्याचा प्रयत्न केले आहे.

**प्रस्तावना:**

लोकसाहित्य हे मानवी जीवनाचा गाभा आहे. लिखित साहित्य पेक्षा मुखातून मुखाकडे असा लोकसाहित्याचा साखळीबद्ध प्रवास दिसून येतो. मानवी संस्कृतीच्या खुणा प्रथा, परंपरा, सणंवार, उत्सव, जीवनरीती यांचा चालता बोलता दस्ताऐवज म्हणून याचे महत्त्व अधोरेखित करावे लागेल. लोकसाहित्य हे केवळ मनोरंजनाचे वा संकलनाचे साधन नसून एका विशिष्ट आदिम समूहाच्या जगण्याचा त्यांच्या सामूहिक अनुभवाचा साक्षात्कार आहे. लिखित साहित्याला अक्षरांची मर्यादा असते पण लोकांनुभवातून असंख्य अनामिक कर्त्यांनी पिढ्यानपिढ्या मौखिक परंपरेचा दुवा तेवत ठेवल्याचे दिसते. त्यांचा निर्माता समूहमन असून मातीचा सुगंध घेऊन त्यांनी भाषेचा वापर केला. समजण्यासाठी सोपी, ओघवती रचना आढळते. त्याचप्रमाणे लोकगीतांमध्ये नादमाधुर्य, लयबध्दता, आणि गेयता यामुळे सर्व सामान्यास सहज समजेल अशी उस्फूर्त रचना मनात गुंजत राहते. यासारखी वाङमयीन विशेष वैशिष्ट्यपूर्ण आहेत. लोकसाहीत्यातील महत्त्वाचा पैलू म्हणजे प्रतीकात्मकता होय.या लोककवीनी आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी निसर्गातील वेगवेगळ्या प्रतिमांचा वापर केला. चंद्र, सूर्य, तारका, नक्षत्रे, राशी, पक्षी, वेली इत्यादी तसेच घरात वापरण्यातील नेहमीच्या वस्तू जाते, मूसळ, आभूषणे, वस्त्रे, घुंची, पलकर, पोलक, गोंधळ, वाकळ यासारख्याचा वापर करून अत्यंत सखोल विचार मांडले आहेत. ही प्रतीके केवळ शब्द नसून ती त्या संस्कृतीचे ,अर्थसंबंधाचे, मानवी जीवनाचे अंतरंग आहे.

**लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप:**

‘Folk Lore’ या शब्दाला मराठीमध्ये लोकसाहित्य या शब्दाचा वापर केला जातो. लोकविद्या, लोकयन, लोकवार्ता, लोकवाड्मय अशी काही संज्ञा या शब्दासाठी वापरल्या जातात. लोक आणि साहित्य या दोन शब्दांनी बनलेला सामाजिक शब्द असून ‘लोक’ या शब्दाचा अर्थ ‘वाहणारा’ किंवा ‘वहाण्याचे काम करणारा जनसमुदाय’ असाही होतो. ऋग्वेदामध्ये ‘लोक’ हा शब्द जनसामान्य या अर्थाने असून तर अशोकाच्या शिलालेखानुसार ‘लोक’ याचा अर्थ समस्त ‘प्रजा’ असा होतो. साहित्यातून मानवीभावनाचा आविष्कार होतो. संस्कृतीचा आशय साहित्याच्या माध्यमातून संक्रमित होतो.पण folk lore ही संज्ञा लोकविष्काराच्या वेगळेपणाचा संदर्भ घेऊन मोजण्यात येते. ललित साहित्य हे अभिजनाच्या ग्रांथिक भाषेत, लिखित साहित्याच्या परंपरेतून अभिव्यक्त होते. लोकसाहित्य हे लोकमानसाच्या बोलीभाषेतीतून, मौखिक परंपरेतून व्यक्त होते.

**लोकसाहित्याच्या व्याख्या:**

लोकसंख्येची व्याख्या विशिष्ट अंगाने केल्या आहेत. मानववंश शास्त्रीय दृष्टिकोन समूहाच्या प्राचीन अवशेषावर भर देतात. मानसशास्त्रज्ञ लोकसाहित्यातून लोकमाणसाचं प्रकटीकरण होते यावर भर देतात. लोकसाहित्य हे मौखिक स्वरूपाची असून क्षेत्र व स्थाननिष्ठतेवर भर देते. प्रचलित दंतकथा, दैवत कथा, व्रत कथा, लोकविश्वास श्रद्धा, विधीकर्मे यांचा समावेश होतो. “पारंपारिक लोक जीवन पद्धती म्हणजे लोकसाहित्य किंवा लोक माणसातील कृतींचा आविष्कार

म्हणजे लोक साहित्य.'' **( १)** ही शरद व्यवहारांची व्याख्या लक्षात घेता मानवाने आपल्या जीवनजाणिवांचे संचित प्रकट केलेले दिसते. ना.गो. कालेलकर यांच्या मते, लोक म्हणजे एका वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा वर्ग. प्रभाकर मांडे यांनी'लोक' विषयी मांडलेली भूमिका पाहणे देखील आवश्यक्य आहे. ते म्हणतात. "लोकं म्हणजे असा जो सुसंस्कृत किंवा समाजापासून दूर असतो. त्यांच्यापेक्षा निराळे आणि परंपरेने चालत आलेले जीवन जगतो. पारंपरिकता हा या समाज जीवनाचा एक महत्त्वाचा विशेष असतो. हा समाज एक संघ असून सुसंस्कृत समाजामध्येच परंतु निराळे जीवन जगतो."(**२)** यावरून लोकसाहित्यात लोक संस्कृतीचे महत्त्व दिसते. लोकसाहित्याच्या गाढया अभ्यासक तारा भवाळकर यांच्या मते,"जे खेड्यात राहतात किंवा शहरात राहतात. त्यांना स्वतःच्या संस्कृतीत परंपरेचे भान असते. जे परंपरेने चालत आलेले जीवन जगतात. ही परंपरा मौखिक स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत येते. त्यांचे जीवन नैसर्गिक, सहज आणि स्वाभाविक असते."(३)folk lore ही व्यापक संकल्पना असून त्यामध्ये लोककथा, लोकगीते, लोकनाट्य,लोकविधी यासारखे वाङ्ममयीमन रूपबंधांना स्पर्श करणारी रूपे दिसतात. म्हणी,वाक्यप्रयोग,प्रहेलिका ही भाषिक अभिव्यक्ति रूपे दिसतात. तसेच विधिविशेष, श्रद्धा, समजुती, रुढी, सण-समारंभ, उत्सव,धर्माचरण, कर्म यांचाही या संज्ञेत समावेश होतो. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी 'लोकविद्या' अशी सर्व समावेशक संज्ञा सुचविले. वि.का. राजवाडे यांनी लोककथा, लोकगीत, तर दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्य' डॉ. प्रभाकर मांडे 'लोकसहित्य' ही संज्ञा दिली. कालांतराने ही संज्ञा मराठीत रुजली. जॉर्ज एम. फास्टर यांनी लोकसाहित्य लवचिक असून लोकसमूहाच्या भाषाविष्काराचा समावेश केला आहे. लोकसाहित्य ही ग्रामीण तसेच नागर अशा दोन्ही प्रकारच्या समाज घटकांमध्ये असते असे व्यक्त केले.लोकसाहित्य हे मौखिक परंपरेने ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाताना परंपरेतील मिथके, लोककथा, लोकगीते याचे स्वरूप विशेष व्यक्त करते एकूणच लोकसाहित्याला आदिम मानवी संस्कृतीचा बिलोरी आरसा म्हणावं लागेल.

**भारतीय लोकसाहित्याच्या अभ्यासाचा पाया:**

भारतामध्ये लोकसाहित्याच्या अभ्यासाला सुरुवात भारतीय विद्येद्वारे झाली. ब्रिटिश भारतात आल्यानंतर भारतीय भाषा, आचार, विचार, प्रथा ,परंपरा जाणून घेण्याचे उद्देशाने भारतीय विद्यांचा अभ्यास करण्यास प्रारंभ झाला. संस्कृत भाषेचा अभ्यास आणि त्यांनी केलेला प्रचार इथूनच भारतीय विद्येचा पाया घातला गेला. रॉयल एशियाटिक मुखपत्राचे धोरण लोकसाहित्याला दिशा देणारे होते. "भारतीय बुद्धीला वाहिलेल्या स्वतंत्रपत्रिकेची आवश्यकता अभ्यासकांत भासू लागली. इंडियन ऑंटी क्वेरीच्या उद्देशपत्रात भाषा, इतिहास, वाड्मय व शिल्प यांच्या बरोबरीचे स्थान लोकसाहित्याला दिले गेले. लोकसंख्येच्या या दालनात दंतकथा, लोकगीते, खेळ, करमणुकीचे प्रकार यांचा प्रामुख्याने प्रसार करण्यात आला."(४) भारतामध्ये ब्रिटिश राजवट बळकट करण्यासाठी सर रिझल्ट टेम्पल ,सर डेंझील इबेटसन, सर हर्बट डीसले, विल्यम कृक या अधिकारीनी सरकारी काम म्हणून न पाहता लोकसाहित्याचा अभ्यास

आवड म्हणून केला. लोकसाहित्य वर स्वतंत्र ग्रंथ निर्मिती केली.विल्यम कुक यांनी तर भारतीय लोकसाहित्याचा सूक्ष्मपणे मागवा घेतलेला दिसतो.

**लोककथांचे संकलन:**

लोककथा हे लोकसाहित्यातील महत्त्वाचा भाग असून संकलनाची सुरुवात व शास्त्रीय परिशीलानाच्या मेरीच्या फ्रीयर old Deccan day , मिस स्ट्रोकचा legends of the Punjab, फ्लोरा एन स्टीलचे The wide awake stories, हे ग्रंथ लोककथांचे आद्य संकलन असलेले दिसते. लोकसाहित्य संकलनाची पार्श्वभूमी पाहून भारतीय अभ्यासकांमध्ये जिज्ञासा जागृत झाली.लोकसाहित्याविषयी भव्यदिव्य कल्पना करून लोकसाहित्य हे संस्कृतीचे निदर्शक आहेत. अशी समजूत करून दिली. दुसरी बाजू याच्या अगदी विरुद्ध दिसते. असे अनेक कालसुसंगत विचारप्रवाह आलेले दिसतात वादप्रतिवादामध्ये अडकून न पडता या विषयाच्या अभ्यासातील उणीवा दूर करून निखळपणे काम केल्याशिवाय स्वतंत्र अभ्यास होणार नाही.

या विवेंचनावरून लोकसाहित्य संकलनाचे मोठे काम असून संशोधक आणि ते उपलब्ध करून दिलेले आहे. लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीचे वाहक आहे.मानवाने युगानुयुगे घेतलेले अनुभवाचे सार आहे. यात धर्माचरण ते कृषीजीवन यासर्व बाबी यामध्ये येतात.वाड्मयीन भूमिकेतून त्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.असे मला वाटते.

**संदर्भ आणि टिपा:**

1. लोकसाहित्य: संकल्पना व स्वरूप, डॉ.शरद व्यवहारे, कैलाश पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमआवृत्ती, जानेवारी १९९९ पृ.१५
2. लोकसाहित्याचे स्वरूप, डॉ.प्रभाकर मांडे, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमआवृत्ती, १९७८ पृ.८
3. लोकसाहित्य, डॉ. तारा भवाळकर, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक पुस्तिका.
4. लोकसाहित्याची रूपरेखा, दुर्गा भागवत, वरदा बुक्स, पुणे, पाचवी आवृत्ती जानेवारी २०२१ पृ.१४